म. ग्रं. सं. ठाणें
य काव्य
नं. ९८७.



मराठी ग्रंथ संग्रहालय
काव्य नं.
REFBK-0002825
REFBK-0002825

# बोधामृत

लेखक,

रा. रा. मारुतीराव नारायणराव कोपर्डे, कऱ्हाडकर.

REFBK-0002825
REFBK-0002825

प्रकाशक—

ग्रंथ भंडार, लेडीहार्डिंजरोड, माटुंगा–मुंबई.

प्रथमावृत्ति सं० १९८१ मू० चार आणे

बडोदें–शियापुरा, लुहाणामित्र स्टीम प्रेसांत ठक्कर अंबालाल विठ्ठलभाई यानीं प्रकाशकासाठीं ता. १५–७–२५च्या रोजी छापून प्रसिद्ध केलें.

रा. क्र. २०२५

# कर्त्याचे दोन शब्द.

बोधामृत शतूपदि संपूर्ण लिहून गेलीं २।३ वर्षें झालीं, पण तिचा उदय कांहीं झाला नव्हता. अस्तु, माझी संपूर्ण इच्छा ही होती कीं कोणत्या तरी धार्मिक, नैतिक अशा सज्जन गृहस्थाचीं हातींती द्यावयाची होती. त्याप्रमाणें यतिजी जैन पंडित मनसाचंद्रजी महाराज हें दिसले व सर्वस्वी कार्य त्यांच्या स्वाधीन केले आहे. माझा प्रयत्न हा पहिलाच आहे. पदामध्यें अगर चालींमध्यें गुणावदोष आढळून आल्यास व त्या योग्यशीर मला चुका कळविल्यास त्यांचा मी फार आभारी होईन. वाचक एक मुख्य तत्त्व जाणून क्षमा करतील अशी मला आशा आहे. तसेच या पुस्तकांत हृदय-तरंग-सुमनें ही गद्यरूपांने घातली आहेत त्यांचा सु-वास घेऊन टाकण्याची ती फुलें नव्हें. माझ्या कार्याला वरील सद्गृहस्थांनी जी सहानुभूती व खटपट केली त्यांचा मी फार आभारी आहे.

आपला सर्वांचा नम्र

कऱ्हाड

**मारुती नारायण कोपर्डे.**

# भूमिका ।

रा. रा. मारुतीराव नारायण कोपर्डे कराडकरने, आध्यात्मिक विषय संबंधी बोधामृत नामक पुस्तक तैयार की है, जिसमें तत्त्वज्ञानके विषयमें अनेक पद्य तथा गद्य व तनात्मासंवाद लिखकर पुस्तकको अति उपयोगी बना दिया है। आध्यात्मिकताके अतिरिक्त व्यावहारिक, नैतिक, व धर्मभावना–प्रभुभक्तिकी उत्तमताको भी भलीभाँति उसमें दर्शाया है।

संसारमें अनेक प्रकारके ज्ञान-विज्ञान कला कौशल हैं, परंच वे सब आधिभौतिक सुखको ही प्राप्त कराते हैं पारलौकिक वास्तविक सुख उनसे नहीं मिल सकता। अखंड मुक्तिका सुख तो तत्त्वज्ञानसे ही प्राप्त होता है, गीतामें श्रीकृष्ण कहते हैं— "तत्त्वज्ञानं विना पार्थ सर्वज्ञानं निरर्थकम्" जब तक मनुष्यको यह मालूम नहीं कि, मैं कहाँसे आया हूँ? मैं कौन हूँ? मेरा क्या स्वरूप है? किस कारणसे मेरा जन्म हुआ है? आगे कहाँ जाऊँगा? मेरा कर्त्तव्य क्या है? नाना प्रकारके सुखदुःख क्यों भोग रहा हूँ? मेरा और मुझसे जुदा क्या है? इत्यादि बातोंका यथार्थ ज्ञान हुए विना कभी भी जीवोंका जन्म-मरणसे छुटकारा नहीं हो सकता, इसी लिए शास्त्रकार आध्यात्मिक ज्ञानको ही सर्वश्रेष्ठ यथार्थ ज्ञान कहते हैं।

संसारी मनुष्योंको बड़े बड़े शास्त्र पढ़नेका व सुननेका अवकाश नहीं मिलता, उनके लिए ऐसी छोटी छोटी पुस्तकें ही उपयोगी होती हैं और जो गायनके रसिक हैं उनको तो विशेष आनंददायक है। प्रभुभक्ति और चित्तकी प्रसन्नता दोनों ही इस बोधामृतमें हैं। और जबतक चित्तकी प्रसन्नता नहीं होती तबतक वह भक्ति शुष्क निरस ही होती है, वैसी शुष्कभक्ति फलदायक नहीं होती, इस वास्ते भक्तजनोंको हमेशा अपने चित्तको प्रसन्न करके ही प्रभुभक्ति करना चाहिए और उस भक्तिरसमें आध्यात्मिक वाक्य ही होने चाहिए, सो इन पद्योंमें तद्रूप हैं।

प्रायः वर्त्तमानमें देखा जाता है कि, लोगोंकी अभिरुचि– नाटक, कादंबरी, उपन्यास आदि चटकीली–जो चारित्रको भ्रष्ट करनेवाली, मनको मलिन करनेवाली और श्रद्धा मर्यादा एवं प्रभुभक्तिसे गिरा देनेवाली, तत्त्वज्ञानसे शून्य ऐसी दुर्गुणोंवाली– पुस्तकोंमें विशेष है। जिनके वाचनेसे सिवाय ऐयाशी चालाकी व नास्तिकता और मानसिक पापबंधनके दूसरा कुछ लाभ नहीं; तो भी मुग्ध जीव, ऐसी निरुपयोगी पुस्तकोंमें अपना अमूल्य समय नष्ट कर देते हैं। विवेकी जनोंको हमारा सप्रेम अनुरोध है कि, कदाचित् आप लोग मनोविनोदके लिए, नाटक कादंबरी आदि पुस्तकें मनन करते हैं वैसे ही कुछ थोड़े समयके लिए आध्यात्मिक तत्त्वकी पुस्तकोंका भी मनन करते रहा करें जिससे चित्तको किंचित् शांति मिले और ज्ञान भी प्राप्त हो। बड़े बड़े

महर्षियोंने अनेक प्रकारकी तपस्याएँ करके योगबल प्राप्त किया था फिर अथाग परिश्रम द्वारा, वे अपने ऊपर महान् उपकार करके अज्ञानांध जीवोंकी कल्याणकी कामनासे नरक तिर्यंचादि दुर्गतियोंके नाना प्रकारके भयंकर जन्मजरा मरणके दुःखोंसे छुड़ानेके लिए, अनेक उत्तमोत्तम शास्त्रोंकी रचना करके छोड़ गए हैं अगर हम उन पुराने ग्रंथोंकी कदर न करें—एवं उनका पठन—मनन न करें तो हमारे जैसा दूसरा कौन कृतघ्नि और कुपात्र होगा ?

खेदका विषय है कि, इस कलियुगमें वातावरणके परिवर्त्तन होजानेसे अपन ऋषिवाक्योंसे बहुत पतित होगए हैं, अर्थात् अपने अंतरंगसे तत्त्वज्ञान, श्रद्धा, भावना, संयमबल, योगबल, दया, सत्यता, ब्रह्मचर्य, ऐक्य आदि सद्गुण नष्ट होकर इनके स्थानमें दुर्गुणोंने संपूर्णरूपसे निवास कर लिया है, इसी कारण अपनी पतित दशा हुई है, इसका मुख्य कारण—ऋषिवाक्योंका उल्लंघन, तत्त्वज्ञानसे वंचित रहना कुसंस्कारोंका संसर्ग, धार्मिक भावनाओंमें मलिनता और आध्यात्मिकवाद—तत्त्वज्ञानका अवलोकन नहीं करना इत्यादि हैं। यदि अपने जीवनको उच्च पवित्र बनाना है तो आध्यात्मिक वादके पुस्तक मनन करनेमें विशेष रुचि बढ़ाना चाहिए, यद्यपि यह आध्यात्मिक विषय पहले-पहल शुष्क ही प्रतीत होगा, परंच फिर अभ्यास होने पर स्वतः ही अपने आत्माको शांति—प्रसन्नता मिलती चली जायगी।

यह जो बोधामृतकी छोटीसी पुस्तक है इसमें भी आध्यात्मिक विषयकी बातें ही संक्षेप रूपसे बोधित की गई हैं और वे बातें भद्र पुरुषोंके अत्यंत उपयोगी हैं इनका मनन करके फिर आगे उच्च तत्वज्ञानमें गति बढ़ाना चाहिये, जिससे कर्त्ताका श्रम सफल हो । इति शम् ।

यति मनसाचंद्र ।

सं.ग्राम [illegible]
22-२-५५

# बोधामृत.

१ परधर्मीय व परान्नपुष्ट होऊं नका.

२ दुसऱ्याचें अंतःकरण दुखवेल असें भाषण करूं नका.

३ वस्त्रालंकारास भुलूं नका.

४ स्वतःच्या कष्टाची भाजीभाकर खात चला, पण गुलामगिरीची तूपरोटी खाऊं नका.

५ संतचरित्रें वाचीत चला; पण नाटकें, कादंबऱ्या वाचूं नका.

६ सत्कर्में करीत चला, पण बोलून दाखवूं नका.

७ स्पष्ट भाषण कडू लागेल पण तें शेवटीं पटेल, पण आंत विषारी व बाहेर गोड भाषण अशा भाषणास भुलूं नका.

८ आपसांत तंटा भांडण करूं नका, जर कदाचित केलाच तर सरकारांत जाऊं नका.

९ निश्चय धरा पण स्वस्थ बसूं नका.

१० सदा सुख मानीत चला; दुःखाचा लवलेश मानूं नका.

११ प्रेमानें प्रेम खेचीत चला; पण दुःखानें दुःख खेचूं नका.

१२ अ-नीतीची पायमल्ली करा पण धर्माची पायमल्ली करूं नका.

१३ सर्व धर्म धुंडाळीत चला पण परधर्मीय होऊं नका.

१४ स्व-देश व स्व-धर्म यांच्यावर श्रद्धा ठेवा पण परदेश व परधर्म यांची वारवाणणी करूं नका.

२८२५
दा. क.

१५ धर्म पाळीत चला, पण तो मनापासून पाळा.
१६ भक्ति करीत चला, व पापाचा लवलेश मनाला होऊं देऊं नका.
१७ समदृष्टि ठेवीत चला; ईश्वरास दूर लोटूं नका.
१८ करणें असेल तें करीत चला पण मिथ्या बडबडूं नका.
१९ बाणेदार बना. पण कोठें ? शत्रूशीं ! ईश्वराशी नका.
२० हिंमत धरा; पण धीर सोडूं नका.
२१ सर्व धर्मतत्वें शोधीत चला; सु-ग्राह्य असेल तेंच घ्या वाईट घेऊं नका.
२२ कोठें ही जा गुडघाभर पाणी पाहतां जनीं अंतीं चक्रपाणी सोडूं नका.
२३ तीर्थें व्रतें करा, पण विवेक सोडून वागूं नका.
२४ उपकार करीत चला; तो केव्हां ही उपयोगी पडेल; अपकार करूं नका.
२५ सर्वांत श्रेष्ठ काय ? तर ज्ञान. तें शोधीत चला. अ-ज्ञानी बनूं नका.
२६ ईश्वराला दूर शोधण्याच्या भानगडींत पडूं नका.
२७ ईश्वर आपल्या स्वतःजवळ आहे; त्याच्या संशोधनास लागा, दूर जाऊं नका.
२८ अनुभवानें शहाणे होत चला नुसत्या बोलण्यावर विश्वास ठेवूं नका.

२९ होईल तें करीत चला; पण काय ? तर सत्कर्म; इच्छा धरूं नका.

३० उपकार करीत चला पण उपकाराची अपेक्षा बाळगूं नका.

३१ स्व-देशी धान्य व स्वदेशी वस्त्र वापरीत चला. तेणें करून शरीरास आरोग्य होईल अन्य परदेशी वस्तुचा संसर्ग होऊं देऊं नका.

३२ टिकावू घेत चला; दिखावूस भूलूं नका.

३३ प्रसंगोपात जुलुम सहन करा पण विचार सोडूं नका.

३४ उद्योग सारखा करीत चला; ईश्वर तुम्हांस यश देईल. भिऊं नका.

३५ परस्त्री मातेसमान समजा; विशेष कार्यांत यश येईल; पाप भीरू बनूं नका.

३६ ब्रह्मचर्य पाळीत चला; हितावह आहे; पण घसरूं नका.

३७ परीक्षा करा, पण विषाची करूं नका.

३८ बोध घ्यायचा असेल तर क्रोध आणि अ-विश्वास टाका.

३९ खोटें बोला पण कोठें ? आपल्या बोलण्यापासून ज्या जिवाचें संरक्षण होतें तेथें; बाकीं खोटें बोलूं नका.

४० लोक चांगलें म्हणतील असेंच करीत चला पण निंदक बनूं नका.

४१ गोगलगाय पोटांत पाय; अशी करणी करूं नका.

४२ स्पष्ट असेल तें सांगीत चला. भिऊं नका.

४३ तत्त्व सोडून बोलूं नका.

४४ पोपट पंचवीशी करूं नका.

४५ अंगीं कर्तव्यता असली तरी तिचा भलत्याच ठिकाणीं दुरुपयोग करू नका.

४६ माप; पाप; अंतीं जिवाला ताप असें करू नका.

४७ मानापमान जाणीत चला; पण कोठें ? ईश्वरभक्तीमध्यें नव्हे लक्षांत ठेवा.

४८ यःकश्चित कापसाचें बोंड किती जिवांचें संरक्षण करतें याची जाणीव धरा.

४९ रानांत जाऊन नामस्मरण करण्यापेक्षां, गृहस्थाश्रमांत राहून एकांतांत केलेलें काय वाईट ?

५० तळें राखील तो पाणी चाखील ही गोष्ट खरी; पण त्याचें प्रालब्ध असेल तेव्हांना.

५१ ईश्वरमार्गामध्यें शकुन अपकुन पहात जाऊं नका.

५२ कोठेंही जा तुझी पडच्छाया तुझ्याबरोबर आहे. तसाच मृत्युही तुझ्या बरोबर आहे; याची जाणीव धरून नामस्मरण करीत जा.

५३ प्रत्येक वस्तूचा सूक्ष्म रीतीनें विचार करीत चला; धिःकार करूं नका.

५४ नास्तीक बनून पुण्य प्राप्त होत नसतें.
एका भक्तिमार्गानें पुण्य प्राप्त होत असतें.

५५ तीर्थें व्रतें केली; इंद्रियें स्वाधीन नाहीं झालीं तर ती व्यर्थ होत.

५६ गुरुविना अनुभव व भावाविना देव कळणार नाहीं.

५७ दिवसभर काबाड कष्ट करून निजतेवेळीं परमेश्वराचे गुणानुवाद गात जा.

५८ मानस-सरोवरांत नित्य स्नान करीत चला व षड्रिपूंचा त्याग करा.

५९ विवेकचष्म्यांतून नीट अवलोकन करीत चला; म्हणजे तुम्हांला सुखी कोण व दुःखी कोण हें कळून येईल.

६० एकाग्रतेमध्यें बसून नीट आपले आचार विचार शोधीत चला; म्हणजे तुम्हांला कळेल.

६१ सत्संग करीत चला; बुद्धि तीव्र होते. दुर्जनांचा संग करूं नका.

६२ पचवीत चला. तें काय तर ज्ञानामृत ! अर्धवट बनूं नका.

६३ सर्व शक्तिमान कोण ? तर परमेश्वर ! त्याची जाणीव धरा. विसरूं नका.

६४ शरणागताला अभय द्या; त्याच्याकरतां प्राण देण्यास विसरूं नका.

६५ शांत आणि उदात्त होत गेल्यानें मनाची प्रवृत्ति अधीक वाढते; दुबळे बनू नका.

६६ आज होईल तें करा पण उद्यावर टाकू नका.

६७ स्मरेल तें चांगलें लिहा विसरूं नका.

६८ संगतीचा परिणाम हा झालाच पाहिजे. सावध असा; फसूं नका.

६९ परस्त्री परद्रव्य यांचा अभिलाष धरूं नका.

७० घसरेल तो पडेल पुन्हा उठेल; मग सावधपणा सोडूं नका.

७१ ओल्याच्या ठिकाणीं जसा पेरणीचा उपयोग होईल तसा कोरड्या जमिनीवर होईल काय ? तद्वत ज्ञानी व मूर्ख.

७२ लहान मूर्ति पण थोर कीर्ती असेंच करीत चला; दुबळा विचार आणूं नका.

७३ साधू संताचें चरण वंदीत चला; हा एक भक्तिमार्गींतला आचार आहे.

७४ आळशी व गुंड होऊं नका.

७५ लोकांनीं चांगले म्हणण्याला बराचसा काळ घालवावा लागतो, पण वाईट म्हणण्याला फार काळ घालवावा लागत नाहीं, हें नीट लक्षांत ठेवा.

७६ कोणाचे उच्छिष्ट भक्षण करण्याची मनाला प्रवृत्ती होऊं देऊं नका.

७७ प्रापंचिक बाबतींत फसूं नका; त्रास फारच झाला असें वाटल्यास एकांतांत एक तासभर बसून मनन करण्यास विसरूं नका.

७८ खरें खोटें याचें नीट निरीक्षण करीत चला खोट्यास फसूं नका;

७९ श्रद्धाळु बना; पण पापी बनूं नका.

८० वारंवार मनुष्य जन्म येणार नाहीं हें एक वाक्य लक्षांत ठेवा; मायामोहांस भुलूं नका.

८१ जन्माला येऊन सार्थकता केली पाहिजे हें विसरूं नका;

८२ धर्मवाक्य तुम्ही जें बोलून गेला त्याप्रमाणें तुम्ही जर कांहीं केलें नाहीं तर परमेश्वराचा तुमच्यावर एक प्रकारचा कर्जाचा बोजा राहूं शकतो; तर अविचारानें बोलूं नका.

८३ सर्व कांहीं आहे तें तुमच्याजवळ आहे. विसरूं नका.

८४ तुम्ही आपला जमाखर्च जसा पहातां तसा तुमचा जमाखर्च पहाणारा कोणी आहे किंवा नाहीं, याचा विचार केला आहे काय ?

८५ अणु रेणु व्यापून जीवात्मा किती उरला आहे हें अभ्यास करून ज्ञान मिळवा.

८६ जें होणें तें होऊन जातें; पण जो तुम्हांला दुर्वाक्य बोलला तें मात्र तुमच्या अंतःकरणांतून जात नाहीं; तर तुम्ही ही कोणाला तसें बोलूं नका.

८७ प्रसंगोपात आचार सोडा पण विचार सोडूं नका.

८८ स्वताला जें स्मरेल व लोक ज्याला चांगले म्हणतील असेच लिहीत चला; आणि आपली चुकी कबूल करा; त्यायोगें तुम्ही शहाणेच होत जाल हें विसरूं नका.

८९ मूर्खाला दुरूनच नमस्कार करीत चला; जवळ जाऊं नका.

९० इंद्रिय दमन करणें हा एक उत्तमोत्तम गुण आहे. योग अभ्यासांतील व ईश्वराकडे नेणारा हा एक मार्ग आहे.

९१ सर्वच पाषाणाच्या देवमूर्ति बनूं लागल्या तर इतर कार्याला पाषाण कोठले आणायचे ? तद्वतच सर्वजण मुमुक्षु बनूं लागले तर मोक्षाच्या ठिकाणीं जागा मिळेल काय ? तर हें सर्व कर्मावर अवलंबून आहे.

९२ परावलंबी सौख्य होत गेल्यानें निर्बलता प्राप्त होते; व लवकरच मृत्यूच्या जबड्यांत जावें लागतें विसरूं नका.

९३ दानामध्यें अन्नदान श्रेष्ठ होय; हें करीत गेल्यानें सर्वांच्या मुखांतून आर्शीर्वाद युक्त निघालेले शब्द कधींही वाया जाणार नाहींत; नादान होऊ नका.

९४ लीनता धरीत गेल्यानें पुढील कार्यास अडचण पडत नाहीं; ताठूं नका.

९५ भरलेला संपूर्ण पाण्याचा घडा आणि अर्धवट भरलेला; बहुत ज्ञानी व अर्धवट हें विसरू नका.

९६ भाराभर ग्रंथ उलथे पालथे करीत बसण्यापेक्षां थोडेंच वांचुन त्याचा मननपूर्वक विचार करून आचरणांत आणलेलें काय वाईट ?

९७ सिद्ध मार्गाचें अवलंबन करीत चला, उगीच वितंडवाद घालूं नका.

सं. आव ७७८

९८ लोकांना फसविण्याचें मार्ग अनेक आहेत. तसेंच तुम्हांला फसविण्याचे लोकांचें ही मार्ग अनेक आहेत. तुम्ही ही फसूं नका; व त्यांनाही फसवूं नका.

९९ अ–हिंसा हें एक तत्त्व उत्तमोत्तम आहे. याचा विसर पडूं देऊं नका.

१०० जेथें सत्कार्याचा तुमच्यावांचून खोळंबा झाला आहे. तेथें जाण्यास माघार घेऊं नका.

१०१ साधुसंतांचा बाष्पळ छळ करू नये; त्यांचीं अंतःकरणें दुखविणें म्हणजेच ईश्वराचा गुन्हा करणें होय.

१०२ ज्या प्रमाणें आपले कपड्यावर डाग न पडूं देण्याची खबरदारी घेतां तद्वतच अंतःकरणाला कीर्तिला आणि स्व–कुलाला डाग न पडू देण्याची खबरदारी घ्या.

१ ( चालः—जियो कारो उठ बरसाली )

ॐ सद्गुरु नमन करितसें मीं आधीं ॥ धृ० ॥
कोण तारि तुजविण भव सागरीं ॥ बा तूं
दिसशी मज आधीं ॥ १ ॥
भावें गाइं ध्याइं शत-पदि-रुपें सुमनें हीं ॥
नारायण-सुत वाहीं तव पदीं प्रेमानंदीं ॥ २ ॥

२ ( चालः—आनबान जियामे )

ॐ; ॐ; सदा वदारे ॥ पाप हारिरे ॥ धृ० ॥
सार्थकचि करूनि घेइ ॥ तरिच जन्म सफल
होइ ॥ जनन मरण चुकवितेरे ॥ नारायण—सुत ध्यायीं रे ॥१॥

३ (चालः—स्वार्थीजी प्रीति मनुजाची )

ॐ ती ॥ दे यांना सु-मति ॥ धृ० ॥
विषयांधानें जग बा भरलें ॥ घालवि दु-र्मती ॥ १ ॥
इह लोकिचें सौख्यचि मानुनि ॥ अंति होय फजिती ॥२॥
सकला माजि प्रथम असशि तूं ॥ श्रेष्ठ तुज गणिती ॥३॥
नारायण-सुत विनवित बारे ॥ भक्ति नित्य घडीती ॥४॥

४ ( चालः—कशि आले या ठायासी )

ॐ कारा देई थारा रे; तव ती मला ॥ धृ० ॥
संयुक्त असलि का; एकचि असलि ॥
समजेना रे; कांहीं मला ॥ १ ॥
नारायण-सुता सद्गुरु आधीं ॥ तव ठाव देइ
आनंदी जीव झाला ॥ २ ॥

५ ( चालः—वसंतीं बघुनि मेनकेला )

ॐ जरि कळलें न तुजला ॥ सद्गुरु पाशीं शरण
जाउनि बोधामृत प्याला ॥ धृ० ॥ पिउनी जीव
तृप्त झाला ॥ अन्य न उरले मग कार्यला
मुक्त तो झाला ॥ १ ॥ क्षण क्षण जाइ काळाला ॥
केव्हां येउनि घेउनि तव तो जाइल प्राणाला ॥ २ ॥
उठि उठि टाकिं आळसाला ॥ धुंडाया तू जाउं नकोरे
ओळख आत्म्याला ॥ ३ ॥ नारायण-सुतें ओळखिला ॥
समदृष्टि ठेउनि पाहि तो लागे कार्याला ॥ ४ ॥

६ ( चालः—मेरे गलिया जांव भाई )

ॐ ह्या नामा जो नर स्मरला ॥ चौऱ्यांयशीचा
फेरा चुकला ॥ धृ० ॥ स्मरुनि स्मरुनि दैव योगें
जयां जवळीं सद्गुरु आला ॥ १ ॥ काय उणे

मग असे तयाला ॥ करित असे तो अनेक लीला ॥२॥
नारायण-सुतें कृपा करुनि ॥ तया मुखानें तो वदियेला ॥३॥

७ ( चालः–त्यजी भक्तासाठीं लाज )

ॐ अक्षर तुज दिसलें ॥ आंधळ्यानें जग ओळखिलें ॥धृ०॥
तूं करित असे पापा ॥ पाहीं सदा बापा ॥
केव्हां मारिल झडपा ॥ तेथेंच राहिले सगळे ॥ १ ॥
नारायण-सुतें धरिलें ॥ सद्गुरु चरण पहिलें ॥
बाबा त्यानेंच तें दाविलें ॥ मन तेथेंच त्याचें रमलें ॥ २ ॥

८ ( चालः–दुति नसे ही माला )

ॐ सर्वांला ॥ तारितसे मला ॥ धृ० ॥
नारायण-सुता जें समजलें ॥ आठवितो
हृदयाला ॥ १ ॥

९ ( चालः–नाहीं मी बोलत आतां )

ॐ असें ताता ॥ माथा ॥ धृ० ॥
लागो तव ती प्रीति ॥ घडी सदा नीति
नारायण–सुत गातां ॥ १ ॥

१० ( चालः–देवांच भासे वनीची )

ॐ एकांतीं जपे मनाला ॥ जपे मनाला ॥ धृ० ॥
अनुहात तो वाजे बाजा ॥ आंत बैसला तो

नं. ....

एक राजा ॥ भेट तयाचि झडकरि घे जा ॥
नारायण सुत तुम्हां वदला ॥ १ ॥ जपे मनाला ॥

११ ( चालः—प्रेम गानीं सतत रमली )

ॐ जपा करत जाई तूं बा सदा ॥
हें नच परि घडेल तुज वरि आपदा ॥ धृ० ॥
जुगारा जो खेळे ॥ करी केविं चाळे ॥
नारायण—सुत मोहा न पडे तूं कदा ॥ १ ॥

१२ ( चालः—पंखे भरली वदनें )

ॐ म्हणाया लाज नको धरु येउनि बारे जन्माला ॥ धृ ॥
विसरुनि जाशी स्व-कर्माला काय म्हणावें बा तुजला ॥
कांता धन सुतादिक सौख्याला यातें कारे बा भुलला ॥
देह तव तो विगलित होता नकरि कोणी मायेला ॥
ऐसी तव ती फजिती होइ न सोडी तूं स्वार्थाला ॥
नारायण—सुत सर्व त्यजोनि सद्गुरु पदि लागियेला ॥ १ ॥

१३ ( चालः—लोळत कच मुखमधुवरि )

ॐ मना सुखकारि ॥ दुःखे ती सर्व हारी ॥ धृ० ॥
सद्गुरु हा एक तात ॥ या विना नसे जगांत
करुनि दावि ऐसी मात ॥ नारायण—सुता एक तारि ॥१॥

१४ ( चालः-बायांनो द्या सोडोनी )

ॐ मना जवळ तू जाई ॥ तेणेचि सुख तें होई ॥ धृ० ॥
सोडोनी जन निंदा ही ॥ स्व-कर्म करित तूं राही
चालः-जरि चंचल बा तूं होशी ॥ मग मिळे मुक्ति ती कैसी ॥
दृढ धरि भावना ऐसी ॥चाल॥ होईल जें जें कांहीं ॥
नारायण-सुत हा गाई ॥ १ ॥

१५ ( चालः-हें हें हें मन तो सावधरे )

ॐ; ॐ; ॐ मना तारि तुला ॥ धृ० ॥ या बिना
तुजला सोपे नसे बा; सद्गुरु शरण जाइरे ॥
तारि तारि एक मला ॥ १ ॥ वृक्षही हाले वरि वरि ॥
मूळ न हाले तें तरि ॥ नारायण-सुता या परि सद्गुरु
ऐसें बोलिला ॥ २ ॥

१६ ( चालः-आइ आइ कालि बदरिया )

ॐ बा मना साधन तुज हे ॥ धृ० ॥ भीतिहारक ॥
पापनिवारक ॥ सोडी सोडी तूं विषय छंद हे ॥ १ ॥
भक्तिच्या या लागुनी नादें ॥ नारायण-सुत धरीं दृढ हें ॥२॥

१७ ( चालः-पितया नमित तव पायां )

ॐ सावध नरा होई ॥ पहा पहा तूं निज हृदयीं ॥
चैतन्य जोवरि असे ही ॥ क्रिडा करि मोदें ही ॥ धृ० ॥

ग्रंथ संग्रहालय

गर्भामाजी वाढूं लागला ॥ सोहं नामा जपूं लागला
बाहेरचि जंव तू आला ॥ चाल ॥ विसरुनी जरि तू
जाई ॥ नारायण–सुत स्मरे ही ॥ १ ॥

१८ ( चालः–राधाधर मधु )

ॐ मना गोविंद वद वद ॥ धृ० ॥ माया मोहा
त्यजुनि बारे ॥ होउ नको मति मंद ॥ वद वद ॥ १ ॥
सकला व्यापक तो जगचालक ॥ तयाचा सदा धरी छंद
॥ वद वद ॥ २ ॥
ऐसा तो परमात्मा वल्लभ ॥ भज भज सच्चिदानंद ॥ वद वद ॥३॥
नारायण–सुताला गुरुनी ॥ दावियेला तो नंद ॥ वद वद ॥४॥

१९ ( चालः–धिम्मा धिम्मा चालो )

ॐ बा मना; शिकवी जना ॥ ह्या विना; गति ना; कुणा ॥
विषय कल्पना; येईचिना; ॥ धृ० ॥ चाल ॥
भाव जरि धरुनि तूं त्यजसी तरि काम ॥
एकांती बा बैसुनी जपशीं जरि तूं नाम ॥
तरंग हृदयीं कसे उठती ते ना ॥ बा धरि एक सद्गुरु चरणा ॥
नारायण-सुताला हा ‘ वीणा ’ लागे भजना ॥ १ ॥

२० ( चालः–भूपती खरे ते )

ॐ सहकारि हे तुला सुखद बहु होई ॥
धरु नको मना बा; भीति जन निंदा ही ॥ धृ० ॥

चालः–वंदिले जरी तुज कोणी ॥ मुकलाशी ॥
सद्गुरु चरण न जाणी ॥ मुकलाशी ॥
संसारा बा; त्यजोनी ॥ मुकलाशी ॥
चल बिचल होउनी ऐशी स्थिती मग होई ॥
नारायण-सुत कथीं एक दृढ धरि हें ही ॥ १ ॥

२१ ( चालः–लाल शाल जोडी जर )

ॐ मना बा; दश इंद्रियें ती॥ करीं बारें तव ती असुनीं ॥धृ०॥
प्रधान नामचि दिधले तुजला॥ चालविशीं सूत्रें म्हणुनी ॥ १ ॥
बा; ऐशी ती सत्ता असुनी ॥ लाविशी का; त्यांना व्यसनीं ॥२॥
पाद गुरुचें दाविशीं त्यांना ॥ जनन मरण ते चुकवोनी ॥ ३ ॥
नारायण-सुताचि वळवोनी ॥ मार्ग दावि ती गुरु जननी ॥ ४ ॥

२२ ( चालः–काय मला भूल पडली )

ॐ मना निंदिती वंदिती तुला ॥ ध्यास तुझा नित्य जरि
तो ही चालिला ॥धृ०॥ सन्मार्गा पासुनी तू नच ढळे कदा ॥
नारायण-सुतासि सद्गुरु बोलिला ॥ १ ॥

२३ ( चालः–गोरे वदन पर )

ॐ या नामाला ॥ ध्यास तो जिवाला ॥ नित्य
जरि तो तरि त्यास तो लागला ॥ धृ० ॥ काय उणे
त्या पडे ॥ जाइ मग तें रडें ॥ सद्गुरुचे पाय ते ॥

मिळती त्या रोकडे ॥ चौऱ्यांयशी लक्षाचे तोडी बा
साकडे ॥ नारायण–सुताला मार्ग हा दाविला ॥ १ ॥

२४ ( चालः—मी कुमार ती कुमारी )

ॐ मना दुःखें ती येतां का; स्मरशी त्या ईशाला ॥
जरि स्मरुनी ती बा; गेली मग न आठवि तूं त्याला ॥धृ०॥
॥चाल॥ स्मशानी जो नर गेला ॥ विवेक त्यास तो झाला ॥
नित्य जरि तो टिकला ॥चाल॥ नारायण–सुत हा विटला ॥१॥

२५ ( चालः—एक दिन जाना रे भाई )

ॐ या नामा तरिलें ही ॥ जगीं कोण कोण ते पाहीं ॥धृ०॥
तरिले जालंधर; तरिले मच्छेंद्र; तरिले गोरखनाथ ॥
तरिले ज्ञानदेव; तरिले नामदेव; तरिले तुकया नाथ ॥१॥
संत नामावळी देत बसतां होईल एक ग्रंथ ॥
इतुके होउनी जे जे गेले प्रपंचि नव्हेत संत ॥ २ ॥
धांदल गडबड बडबड; करुनी काय साधिसी स्वार्था
यःकश्चित तें पोट भरण्या काय मारिसी बाता ॥ ३ ॥
येसी नंगा जासी नंगा; कांहीं नये बा साथ ॥
साकर्म जरि केलें असे तरि संगें येई साथ ॥ ४ ॥
नारायण–सुत वदे तुजला करी नित्य ॐ भजना ॥
तरण्या साधन सोपें असे हें का; जाशी बा वना ॥ ५ ॥

२६ ( चालः—ये बदिमे पाया गंम )

ॐ मना माया ही फार ॥ असे अनिवार ॥ जो त्यजित असे
ही नार ॥ तोचि बा पडला असे भव पार ॥ धृ० ॥
॥चाल॥ यांतुनी कोण न सुटला ॥ सुटला मुक्त तो झाला ॥
मग नसे उरले कार्याला ॥ नारायण–सुताधार ॥
सद्‌गुरु तोडितसे ही बार ॥ १ ॥

२७ ( चालः—हे प्रभो विभो )

ॐ मना तरी सुखी नसे कुणि जगतां ॥ त्या एक प्रभुविण
पहातां ॥ धृ० ॥ धन दौलत सुख बा सारे ॥ दो दिवसांचे हें
बारे ॥ वाटतें तुजसी हे खरें ॥ नारायण-सुत ही त्यजितां ॥१॥

२८ ( चालः—हें बाप माइ; दैवत होई )

ॐ काळाला ही ॥ हटवील हा ही ॥ शरण तूं जाई ॥
बघरे स्व-देहीं ॥धृ०॥ वद वद प्राण्या ॥ धिग् धिग् जगण्या ॥
नारायण–सुत वदे येउनी जन्माहीं ॥ १ ॥

२९ ( चालः—रजनिनाथ हा नभीं उगवला )

ॐ सगुण का; निर्गुण झाला ॥ जें जें दिसतें तव नयनांला ॥धृ०॥
वाद तू का; घालित बसतो ॥ क्षण क्षण तो नीघुनी जातो ॥
आशेतुनी नच कधीं बा सुटतो ॥ मूळाचे येई रे; मरणाला ॥१॥

नाम कधीं तें मुखीं न येई ॥ बाता मारित अनेक तूंही ॥
परि एक तें खरें न कांहीं ॥ दावितसे बघ ढोंग जगांला ॥२॥
बा; ही त्यजुनी उदास राहे ॥ भगवन् नामीं चित्त वाहे ॥
तरिच सार्थक होय तुझें हें ॥ नारायण–सुत वंदित त्याला ॥३॥

३० ( चालः—नर जोबन वालिका मजा लुटा )

ॐ ब्रह्मचि हें दावि मला ॥ दावि मला ॥ भुललों मनाला ॥
हंसलों जिवाला ॥ खुळ लागे मला ॥ धृ० ॥
मम हृदयीं होतें तें नाकळे ॥ खुलें करोनी दावि मला ॥ १ ॥
सर्वा घटिं तो व्यापुनी राहे ॥ बोलतसे कीं; सोहं बोला ॥ २ ॥
नारायण-सुता समजुनी दिधले ॥ एकची गुरुनें या बाळा ॥३॥

३१ ( चालः—पावना पावना या मना )

ॐ मना शिकविना या जना; ॥ देऊं नको तू पापी वासना ॥धृ०॥
तवविना कोण ना; जगतीं ना तूंचि असशी एक तारणा ॥ १ ॥
भक्ति-रूपी ती ' वीणा ' देई करीं तू लावि भजना ॥ २ ॥
नारायण-सुतानें एक धरिले सद्गुरु चरणीं करी वंदना ॥ ३ ॥

३२ ( चालः—अजि अकेली जल भरन )

ॐ मना; सुखद तुला बहु होई ॥ संसार पाश तोडी
ऐसे हे नाम घेई ॥ धृ० ॥ सुलभ सुलभ हें समजे
विरळा ॥ नारायण–सुता जो समजुनी देई ॥ १ ॥

३३ ( चालः—छब दिखला जाय )

ॐ बा मना या; जगा येशी तूं ना; ॥ नर देहा रुपी गृहा या ॥धृ०॥
सुंदर सु-बक असे तुज रहाया ॥ ईश भजन करण्या बा तें ॥
नारायण-सुत वदे तुजसी त्यजि त्यजि सख्यारे ही माया ॥ १ ॥

३४ ( चालः—जमुना तट राम खेळे )

ॐ मना जाई बारे जाई ॥ धृ० ॥ विषयाचा तो त्यजुनी प्रेमा ॥
लागत भजना सदा या जाई ॥१॥ आड जे या येति येतिल कामा॥
नारायण—सुत झिडकारी त्याही ॥ २ ॥

३५ ( चालः—छागयोरे त्येरे नयनोमे राम )

ॐ मना हा सुलभ पंथ ना ॥ धृ० ॥
जिंकिसि षड्रिपुला; काय राम नामी ॥
लत्ता कशानिं अविचार करी हा ॥ सुलभ पंथ ना ॥ १ ॥
वैखरित बोले; अनुहात हाले; ॥ मग जिव न चळे ॥
नारायण—सुत हा सुलभ पंथ ना ॥ २ ॥

३६ ( चालः—पानी भरली कोई )

ॐ म्हणाया सारी खरी लज्जा सोडी मना ही ॥ धृ० ॥
घेउनि करीं बा विवेक कुंभ बा शोधित जा तू तो ज्ञान
सरा ॥ १ ॥ आणुनी जल तें पाजी जना या ॥
नारायण—सुता सद्गुरु भारा ॥ २ ॥

दा. क्र. 2625

३७ ( चालः—दिलदार यार छेलासे )

ॐ बा मना तूं वैभवा वारि ॥ ठेविसी जरी दृष्टि ती खरी ॥धृ०॥ शिखरावरि जातां ॥ तुडविसी अनाथा ॥ विवेक न करी यामुळे तरि हे ॥ १ ॥ त्यजिल त्या वैभवाला ॥ जोड ईशाला ॥ नारायण-सुत वदे ॥ सद्गुरु शरण जाइ रे ॥ २ ॥

३८ ( चालः—मेरे दरदे जिगरकी )

ॐ सगुण निर्गुण स्वभावामुळें ॥ स्वभावामुळेंरे सर्व कळे ॥धृ॥ कळुनीही ढोंग घेतीजे साचे ॥ दावि जगा तो रे बहुपरि चाळे ॥१॥ मज धरुनी करीं परि वनांत नेई ॥ नारायण-सुता दावि भावा बळे ॥२॥

३९ ( चालः—काशि मदनमूर्ति ही पातळी )

ॐ म्हणसी जरि तूं मानवा ॥ स्मररे बारे स्व-जाणिवा ॥ धृ० ॥ जाणिव जरि तू धरुनी वागशी ॥ उणे काय बा; पडे तुजशी ॥ नारायण-सुता न घाली पाशीं ॥ भज भज तूं तरि त्या देवा ॥१॥

४० ( चालः—हो जानत प्रीतरीत खुदाई )

ॐ म्हणत गीत जीत नामाही ॥ हें होतें; साधन तें; सुखदाते; नाम दुःखा हराई ॥ धृ० ॥ तीर्थादिक नियमा कारिसी काय तुला सुखदायीं ॥ चित्त तव बा स्थिर नाहीं वृथा नेम तो जाई ॥१॥ ऐसे जंव ते नाम घेई आवडे जें देवाही ॥ नारायण-सुत हृदयीं ध्यायीं तो शिवात्मा पाहीं ॥ २ ॥

४१ ( चाल:-अवचित गेलें किंकर )

ॐ अकरा ॐ उकरा ॐ मकरा सुखासी थारा ॥
देइल खचितचि सोडवि भारा ॥धृ०॥ सद्गुरुचा असे जो चेला ॥
ओळखिलें ॐ कार बिजाला ॥ जाइ म्हणी तर;
नारायण-सुत गुंगी अवशि तारा ॥ १ ॥

४२ ( चाल:-गोविंद गुण गाऊं रे )

ॐ कारा गुंगी दंगे रे ॥ भक्तिच्या गुंगी दंगे रे॥
तव गुणाला ॥धृ०॥ वेद ॐ बोलत ॥ लोका तो सांगत ॥
वदति ॐ पुराणे ही रे ॐ ह्याला ॥ १ ।
पुनर्विजन्मा न येणे बाहे ॥ दवडिशी वायाते देहा हे ॥
नारायण-सुता तारिरे; ॥ ॐ मजला ॥ २ ॥

४३ ( चाल:-वेडी जहाले गुणी मोहुनीया )

ॐ बोलिले ॥ ऋषि ते सखया ॥ पदी याच बारे सारे ॥
तन झिजवियलें ॥ धृ० ॥ किती सांगुनीया ॥ तुम्हां जागविले ॥
नारायण-सुतेंही ॥ रुचे आवडिलें ॥ १ ॥

४४ ( चाल:-चंद्रकांत राजाची कन्या )

ॐ तव गुण वर्णायाला बुद्धि तूचि दिधली ॥
देउनी करीं मम अमोल्य ऐशी ही ज्ञान वल्ली ॥ धृ० ॥
पूर्वसुकृताचे होतें म्हणुनी ही मज लाभियली ॥
नारायण-सुत असे सदा हा तच्छायेखालीं ॥ १ ॥

दा. क्र.

४५ ( चालः—प्रतिकुल होइल कैसा )

ॐ प्राण्या जपशी जरि तूं या तरि ब्रह्मांते ॥
अ-सुखा सुख दावि तुजला नेकनी पदांते ॥ धृ० ॥
पाप लयाला तें जाई वद वद यातें ॥
नारायण-सुता तोडी भव शृंखलातें ॥ १ ॥

४६ ( चालः—साध्य नसे मुनी कन्या )

ॐ नरा पर दारा ॥ दृष्टिस देखुनी जंव होइ बेजारा ॥धृ०॥ चळ बिचल मग स्थिती ती होई ॥ विवेक मुळीं तो सुचत न कांहीं ॥ काम बळानें पीडीत होई ॥ संग कराया थारा ॥ नेई तुजला नरक द्वारा ॥ नारायण-सुत हरा ॥ १ ॥

४७ ( चालः—दृष्टि भरे जलभारे )

ॐ मना तुजला बारे; ॥ बहुसारे; ॥ दिसणारे ॥ दो-दिवसाचें हें तारे ॥ धृ० ॥ गर्व तू करुनी सोडीलेसही ॥ अनहित केलें समजुनी तू ही बारे ॥ १ ॥ नारायण-सुता तारक तो तरि ॥ मायिक हें जन काक सकल भज; ना रे ॥२॥

४८ ( चालः—मन परदेशी छांड चले )

ॐ राही बा; तू सदा भजना ॥ धृ० ॥ ध्यान धरुनी बैसशी खरा बा; ॥ नको होऊं नाराजी ॥ नारायण-सुत वदे तुला तें ॥ चित्त तें स्थिर करी ना ॥ १ ॥

४९ ( चालः—वारी जाऊंरे सांवरिया )

ॐ प्रेमें हाले डोले तो नर धन्य जगतीं रे ॥ धृ० ॥
जन्मा येउनी सार्थक केलें ॥ जनक जननीचें नांव राखिलें ॥
नारायण—सुत नमि तयांला ॥ जो नित्य ध्यायीं रे ॥ १ ॥

५० ( चालः—क्या दिलमे दाग देना )

ॐ नभीं हा येई जना तोषवाया ॥ धृ० ॥ दिवाभितातेंही कसा
भासे अरिही ॥ ऐशी तमोगुणाही ॥ देखुनी सत्व गुणाया ॥१॥
ईश्वरी पदा या ॥ झिजवि जो स्व—काया ॥ धन्य तो जगतींया ॥
नारायण—सुत गाया ॥ २ ॥

५१ ( चालः—नका टाकून जाऊं डावा डोळा; )

ॐ बा मना दावि तुज कळा ॥ पाहसी या रुपाळा ॥ धृ० ॥
सुक्ष्म हा धरी वारी ॥ भिड या नभो जनांळा ॥ एक भोक्ता;
एक करतां; तुजला हरतां ॥ अरे बा; का; करिसी चिंतेला ॥१॥
तूझी सखया; गेली माया ॥ वैराग्य करेल फिरे तुजंला ॥
जाणें होतां काय पहानां ॥ नच दिसतां ॥ नारायण—सुता
दिधला ॥ सद्गुरु ठाव तो मजला ॥ २ ॥

५२ ( चालः—सांवरिया मोरा प्यारा रे )

ॐ बा मना; सखयारे ॥ तू देइ या जनास ॥ धृ० ॥
बोधामृत तें पाजुनी यांना ॥ दे तृप्त कर बा आस ॥ सखया ॥१॥
नारायण—सुत तृप्त हा झाला ॥ धरली एक गुरु कास ॥ २ ॥

९३ ( चालः—कितीरे गड्या तुझ संगड्या )

ॐ नरारे; घे ध्याना ॥ तुज कल्पना ॥ मग ये न मना ॥ धृ० ॥
देहींचीना; असतोचिना ॥ ओळखिना; अज्ञानपणा ॥
सद्गुरुशीं जाई शरणा ॥ मग तोचिना; तोडीतना ॥ एक या
बा; बंधना ॥ नारायणा-सूताना ॥ १ ॥

९४ ( चालः—मज गमत खचित तुजरे )

ॐ या नामा गजरे ॥ संसारिया तोचि तरे ॥ धृ० ॥
सद्गुरुनी मज जागृत केलें ॥ ॐ सर्वा व्यापुनी गेले ॥
नारायण सुता लाभियले ॥ नेहमी मोद भरे ॥ १ ॥

९५ ( चालः—या मना समान कोण गारुडी असे )

ॐ नाम सुलभ असे म्हणा तुम्ही झणी ॥ करा रंगणी ॥
तमो गुणी ॥ असती जनी ॥ ना बघे कोणी ॥ धृ० ॥
ना बघ त्याला ॥ फेरा सुटला ॥ जा नर्काला ॥ होइ
स्थितीला ॥ परि नच स्मरला ॥ जन्मा येउनीया गेला ॥
पूर्व कर्म नव्हतें त्याला कैचें तरवीं ॥ नारायण-सुताचे ॥
उघडले साचें ॥ म्हणुनी ही करणी ॥ १ ॥

९६ ( चालः—मन तू ना कहीं गया ना आया )

ॐ नरा का; जाशी बा; वनांला ॥ जवळी असोनी
दूर करोनी ॥ वसत देवादि देवा ॥ धृ० ॥ एकांत त्या
चित्ताशी जरि बा योग्य तुझा तो भावा ॥

शरण शरण मी आलों तुजला ॥ घेई प्रेम बलाला ॥
धन्य होशी जगतात ॥ ऐसे घे सुंदर नामाला ॥
जव ऐसे बा पडे भार त्याला ॥ पाप जाय लयाला ॥
नारायण–सुत म्हणे बा तुजला ॥ धरि एक गुरु चरणाला ॥१॥

९७ ( चाल:–प्रेमभावे जीव जगी या )

ॐ न स्मरला तोचि जनीं या मुकला ॥ वाटे मत्
जिवाला ॥ धृ० ॥ पाप सकल करिते भंगा ॥
चंद्र देई शीतलाला ॥ १ ॥ नारायण–सुताला तेविं
भासले ते हाचि वदला ॥ २ ॥

९८ ( चाल:–कली हा दुजा रे )

ॐ ही मजा ॥ कैसी चिज आहे बारे ॥ धृ० ॥ ॐ ही मजा ॥
सद्‌गुरु माया ॥ अजब लोकिंया ॥ हारि हाच आपदा ॥
सुखद कारे ॥ १ ॥ पतंग दीपा घाला ॥ घेइ नाशाला
नारायण–सुत हाच रत ॐ कारे; ॥ २ ॥

९९ ( चाल:–नृप ममता रामावरती )

ॐ मना जिंकिले कामा ॥ इश्वरी सदा जो प्रेमा ॥ वदु कसें ॥
जिंकिले जयानें क्रोधा ॥ काय त्यास मी बोधा ॥ वदु कसें ॥
जिंकिले जयानें लोभा ॥ काय त्यास तो ताबा ॥ बघ असें ॥
॥चाल॥ मद, मोह; मत्सर; हें जाण ॥ हरविती भान ॥बैसले॥
ध्याना ॥ नारायण–सुत सर्वांना ॥ त्यजितसे ॥ १ ॥

६० ( चालः-सावध सावध रे )

ॐ संकटा रे निवारी ॥ करशिल निशिदिनी याची फेरी ॥धृ०॥
महत असो कैचे तें तुजवरि ॥ त्यातुनीया खचितचि तें तारी ॥
श्रम करावें ॐ जवळीं होई जिवाराम ॥ नारायण-सुताचें ॥
साचें ॥ ॐ असे नाम ॥ १ ॥

६१ ( चालः-या लाभो धर्म सेवा ही )

ॐ कापे धर्म तो हा ही अपुल्या दरबारी ॥ जो सर्वा
शासनकारी ॥ धृ० ॥ हें असे सर्वाहुनी भारी ॥ काय
करावी याचि थोरी ॥ १ ॥ सद्गुरु चरण एकाधारी ॥
नारायण-सुतासी तारी ॥ २ ॥

६२ ( चालः-सुंदरी वचन तव मधुर फार )

ॐ स्मृति श्रुति वेद चार ॥ वद म्हणती का; करिसी कार ॥धृ०॥
काय म्हणावें मी तुजला ॥ येउनी जन्मा वाया गेला ॥
धिःकारचि तव जगण्याला ॥ नारायण-सुत सुटे पार ॥ १ ॥

६३ ( चालः-मन मोहन सावरो )

ॐ म्हणत आवरी; ॥ विषयापदा हारिरे ॥ धृ० ॥
हरण हें करी पाप ने लयारे ॥ सद्गुरुसी पूज्य रे; घे त्वरें ॥ १ ॥
समजाया ते तरि ॥ पूर्व कर्म हावे ना; ॥
नारायण-सुताना होतें रे ॥ २ ॥

६४ ( चालः—ही सुरा मधुर सुखकारी )

ॐ धरा सकल सुखदायीं ॥ मम आई ॥ धृ० ॥
चंचल मन तव होत असे तें ॥ शान्त करितसे ही दायी ॥ १ ॥
इडा पिंगला आणि सुषुमना ॥ या परिते असते हे ही ॥ २ ॥
नारायण सुत विनवितसे ही ॥ या परितें दुजे नसे कांहीं ॥ ३ ॥

६५ ( चालः—दत्तगुरु दत्तगुरु दत्तगुरु )

ॐ स्मर; ॐ स्मर; ॐ स्मर; तू तरे ॥
विषय पुढती ते या तुच्छ नित्यरे ॥ धृ० ॥
सुटोनी वायू महा कोसळोनी वीज पडे ॥
धिर धरि धीर धरी होसी कां; घाबरे ॥
ध्यास तुज लागला मुक्ति ती रोकडे ॥
नारायण-सुत वदे येई जवळीं बरे ॥ १ ॥

६६ ( चालः—(किती ही घोर अधोगती )

ॐ मनुजा ही तव तनुजा ॥ जाइ काळाला समज तू मनांला ।धृ०।
झिज झिज; झिजुनी श्रम ते करोनी ॥ साठविसी द्रव्याला ॥
शृंगारादिक सौख्यें करोनी आनंदीत तूं झाला ॥
नारायण-सुत वदे बा; तुजला ॥ परि ही असे दुःखाला ॥ १ ॥

६७ ( चालः—अंध पंगु वा नाहीं केडा )

ॐ असे हा कल्पतरु तरि ठेउनी भावाला ॥
श्रवण मनन अभ्यास करोनी तूं घेई अनुभवाला ॥ ध० ॥

दुर्बुद्धि ती मनीं आणोनी पहात जरि बसला ॥
समजे तुंबीफल जलीं ते नच जाई तळाला ॥
नाना ग्रंथीं मतांतरें ही आणू नको मनांला ॥
नारायण-सुत वदे असे हा ॐ श्रेष्ठ गणिला ॥ १ ॥

६८ ( चालः-ही ही गोडी गुलाबी )

ॐ तोडित; पापा न धाडित ॥
मोक्षा चढण्या सुलभ असे ही ' शीडी ' ॥ धृ० ॥
ध्यासी निशिदिनी यासी पदांला ॥ लावितसे तुजला गोडी ॥ १ ॥
एकच कर्म करीत हें राहसी सद्गुरु मिळे तुज तातडी ॥ २ ॥
एकच सद्गुरु धरला असे हा ॥ नारायण-सुता संगडी ॥ ३ ॥

६९ ( चालः-या संसारी दुःखे भरली )

ॐ नरा तारी ॥ ठेवुनी निर्धारी ॥ बैसशी तू जरी ॥
दुःखें तुझी ती हारी ॥धृ०॥ हरण कराया षड्रिपू असे ही माया ॥
चाल ॥ ऐसे होतां ॥ जवळीं येतां ॥ मोक्ष हातां ॥ ऐसे भारी ॥१॥
खाउनी पिउनी तनु पुष्ट ती करोनी ॥ लावियेशीं ॥
होसि आळसी ॥ ती बा खाशीं ॥ व्यसने सारी ॥ २ ॥
नारायणा-सुता ॥ समजलें तत्त्व आतां ॥
एक दातां होई ताता ॥ तोचि त्राता ॥ सद्गुरु माझारी ॥३॥

७० ( चालः-प्रभु एक जगती त्राता )

ॐ एक धराया छंदा ॥ कां न भजसी मतिमंदा ॥धृ०॥

पूर्व कर्म ते तव मंदा ॥ आतां तरि भज बाऽरविंदा ॥
पुण्याइची गठडी बांधा ॥ पुढील जन्मीं न होय बाधा ॥
नारायण-सुत सांडोनी धंदा ॥ १ ॥

७१ ( चालः-प्रेमें नेमें गाऊं विमल )

ॐ ध्वनी हा किती तरी मंजुल ॥
परिसुनी मनीं न होई खळबळ ॥ धृ० ॥
याचि पंथा गेले मुनीजन ॥ वदतों खचितचि हें मम जाण ॥
स्मर स्मर बारे आळस कारे ॥ त्यजुनी सकल हे षड्रिपु वारे ॥
संसारचि हा पयोब्धि तरण्या ॥ ॐ
नामचि रे साधन वदण्या ॥ नारायण-सुताचे बोल ॥
मायेचा हा एकच गोंधळ ॥ १ ॥

७२ ( चालः-टप्पा भैरवीः-छोलामाऽनन करि ये )

ॐ बोलाऽऽऽहरण करिते ॥ पाप ते तूझें धरियेऽऽऽ
धरियेऽऽऽऽ ॥ अंतरा ॥ पाप्याला खुष करी आत्मा जिवाला ॥
सकल सकल सोड धरियेऽऽऽ ॥ धरियेऽऽऽऽ ॥ १ ॥
जळें लवणें समरस तो होता ॥ मग लवण न गडवाऽऽऽअंतरा ॥
नयना मुखडा नच तो पडतरे ॥ नारायण-सुत बोले रेऽऽऽ॥२॥

७३ ( चालः-अरे; नहीं मोको छोर जोर )

ॐ मना का; करिसी तू घोर ॥ अरे ॥ संसारिया असशी
चोर ॥ अरेऽऽऽ ॥ धृ० ॥ पकुन कसें तें कराया ॥

जाशीं बारें खेचें विवेक तोरे ॥ अरे ॥ ॐऽऽऽ ॥ १ ॥
बुद्धि करीं दे आणुनी तुजला ॥ नारायण-सुता सद्गुरूरे
॥ अरे ॥ ॐऽऽऽऽ ॥ २ ॥

७४ (चालः—बादीला बेगे आयोरे)

ॐ ह्याला ॥ वेगे जपारे ॥ तुम्हां तारण हें होय ॥ ऽधृ० ॥
॥ ॐ ह्याला ॥ अ-सुखा सुख गणी पापी पापी तरत जाय ॥
विषय तरंग चित्तातें ॐ नामा जाय ॥ ऽऽवेगे जपारेऽ ॥
शीतळ आहे गोऽ मधुर हे ॥ नारायण—सुतानें तोडी
मायापाश क्लेश रे ॥ वेगे जपारेऽऽऽ ॥ १ ॥

७५ ( चालः—एऽऽऽऽऽऽऽमाथें मटुकिल लइ जाऊं )

ॐऽऽऽऽऽऽमोर्दे रामकिंऽऽॐऽऽगाऊंऽऽ ॥ न्यारा तोही बळानें
खेंचुन त्या आणवू ॥ ऽऽॐऽऽऽ १ ॥ मज गोपाल गुणी तारी ॥
प्रभो गोविंद राधारी ॥ नारायण-सुता त्या देखाऊं ॥ॐ॥ऽऽऽ॥२॥

७६ ( चालः—काली बादरयामें घेर लिनी देखो )

ॐ आदर गमें; मज इतर तो या ॥ ऽऽॐआदरऽऽऽ ॥
फेर तरण्यारे ॥ धृ० ॥ ऽऽऽॐऽऽऽपळ पळ जाइ विषयीं रमतो ॥
गडप; गडप; तूझी तनु होइ रे ॥ऽऽऽॐ आदर ॥ऽऽऽ
रडत बसशीं कारे उडत भृंगारा ॥ नारायणा—सुता—चाड
सोडी सोडी तीया ॥ ऽऽऽ ॥ ॐ आदर ॥ ऽऽऽ ॥ १ ॥

७७ ( चालः—पतींची सत्ता तुजवरि असोनी लत्ता )

ॐ गातां ॥ मग नसे भयाची वार्ता ॥ घृ० ॥ जाते कीं मग ती
अहंता ॥ येत नसे कीं; प्रपंची चिंता ॥ मोक्ष सायुज्यचि
ये हातां ॥ ठेवि भावना कर्ता हर्ता ॥ नारायण—सुता ॥
विघ्ने ती त्याची हर्ता ॥ १ ॥

७८ ( चालः—नई जोबन वालीका मजा )

ॐ जें जें होतें ते हिता होतें ॥ समजुनी रहाते ॥ साधुते बाते ॥
प्रणाम त्यांते ॥ करीं माते ॥ मौनही नको धरुं हाय ॥धृ०॥
ॐ जें जें होतें ॥ सुखाच्या तो रत करण्याला ॥
नामच वरिते ॥ १ ॥ अ-सार मय मानुनी ही काया ॥
जे याच्या छंदे अनुभवाते ॥ २ ॥ नारायण-सुत सांडुनी
अवघा ॥ मायामय हा भ्रम याते ॥ ३ ॥

७९. ( चालः—प्रेम बाइ हें वेडे )

ॐ मना का; रडे ॥ येत असे ते बा पुढें ॥
अ-ज्ञाना ते जायिना ॥ लावते जयांकडे ॥ धृ० ॥
आशाही भंगुनी वळते ना ॥ तरि त्या इशाकडे ॥
नारायण-सुता त्या ॥ मीन का; जला पडे ॥ १ ॥

८० ( चालः -आनंदाचा कंद हरि हा )

ॐ हरि जरि जन्म मरण तरि ॥ का; तू न भजसी मानवा ॥धृ०॥
पालन कर्ता पोषण कर्ता धरि तरि रे स्व-जाणिवा ॥

का; तव अंगी होसी धुंदी ॥ भरला असे मद् ताटवा ॥
सांडुनी अवघे हें सब चाळे अ-ज्ञाना ते मावळे ॥
नारायण-सुताचा; सांचा ॐ असें हा माधवा ॥ १ ॥

८१ ( चालः—गजल ठुमरी; सुनो तुम यार परदेशी )

ॐ जन; मन; धन; नयनाशीं ॥ मृग भया ते जाई वेगे ॥ धृ० ॥
जावया लागते हरे गती ॥ गाठे या दुर्जन नडे ते ॥
तैसे न करीं बा मनुजा तू ॥ एकत्र ते पार तुला नेईया ॥
उमर तुझी ती गेली वाया ॥ आठविशीं कधीं गुणीराया ॥
नारायण-सुत गाया सद्गुरुचें लागें पायां ॥ १ ॥

८२ ( चालः—दादरा ठुमरी; सांवरीया मन भायोरे )

ॐ म्हणत जाय तुम्ही सांडुनी ती लाज ॥ धृ० ॥
तारक होइ नाम ॥ सांडुनी ते काम ॥ लांछन नाहीं तुम्हां तेरे ॥
वदा आज ॥ १ ॥ स्व-हित अपुलें अनहित कारे ॥
करोनी घेतां इहजन्मा वाया वाज ॥ २ ॥ नारायण-सुता सद्गुरु
ती माता ॥ असतां न होइ कदां ॥ तो ना राज ॥ ३ ॥

८३ ( चालः—गजल कवाली; दिले जानसे )

ॐ एक जनांते तारी ॥ ॐ एक ते निर्धारी ॥ जे स्मरताती
नरनारी ॥ त्यांते हें उद्धारी ॥ धृ० ॥ सोडोनीया काम धंदा ॥
लागे मला हा छंदा ॥ मी एक बोले हारी ॥ तो सर्वचि ही हारी॥१॥

सकलासी आश्रयाला ॥ सकलासी पाळण्याला ॥
नारायण-सुत स्मरला ॥ एक सद्गुरु सहकारी ॥ २ ॥

८४ ( चालः—काना बनसरी बजाय गिरधारी )

ॐ लागत ध्यास बा म्हण हारी ॥ देहा दुःख होय तुला तें किती प्यारी ॥ धृ० ॥ कैसे जपशीं तरि त्या दुःखाना एकच तें नाम निर्धारी ॥ १ ॥ अनेक संकटें येती तुजवरि ॥ त्यांतुनीया तुजसी हें तारी ॥ २ ॥ एकच ॐ हें आवडे जिवा ॥ नच आवड या मना दुसरी ॥ ३ ॥ नारायण–सुत तल्लीन होउनी ॥ जपत ॐ हें नाम मुरारी ॥ ४ ॥

८५ ( चालः—अविचारे कोपांगारा )

ॐ म्हणतां काय जातें ॥ रे बा मातें ॥ समजेना कांहीं तू तें ॥ धृ० ॥
करीं घेतां दीप याला ॥ तमही गेला ॥ तैसे ज्ञानें अ-ज्ञानें
घालवीलें ॥ मुक्तितें भोगी साचें ॥ ॐ नाम घेई स्ववाचें ॥
मत्सरकार ॥ लोभ अपार ॥ काम विकार ॥
सोडोनी थार ॥ नारायण–सुता जातें ॥ १ ॥

८६ ( चालः—राम स्मरावा राम )

ॐ म्हणत तूं जाय बारे ॥ मनुजा ॐ म्हणत ॥ धृ० ॥
इहजन्मा नच घेइ जरि तूं पुढतीं करिसी जरि हाय ॥ मनुजा ॥ १ ॥

पुढील जन्मीं न होय बाधा ऐसेंच तें तूं नाम घेई रे ॥ मनुजा ॥ २ ॥
नारायण–सुता एकचि दिसलें ॥ आणिक नच तें सार ॥ मनुजा ॥ ३ ॥

८७. ( चालः–धर हारि चरण तर तरि )

ॐ तरि स्मरण तूं करी आठव श्री हरी करण्या सायना ॥ धृ० ॥
भजसी मनुजा बारे तनुजा ॥ सुखाला तूं वरि ॥
दुःखाला दूर करी ॥ लाविशीं व्यसना ॥ १ ॥
करि आळशी होउनी बसशी ॥ काळ येई तरि ॥
घेउनी तुज करीं कोण तें सोडिना ॥ २ ॥
नारायण–सुता समजुनी हें तरी ॥ एकच तो वरि ॥
सुखाला साहकारी ॥ रत बा भजना ॥ ३ ॥

८८ ( चालः–श्याम चुनरिया दे दे मोरी )

ॐ तुजला एक तारी ॥ धृ० ॥ एकनिष्ठ तूं ठेउनी भावा ॥
होय बा तें तूजसी हितकारी ॥ धृ० ॥ धांवत देखत रज्जु असे
जरि ॥ भासली ती सर्प हा असे परि ॥
नारायण–सुत भ्रम माघारी ॥ १ ॥

८९ ( चालः–या नव नवल नयनोत्सवा )

ॐ तुम्ही म्हणोनी मन तोषवा ॥ समजायातें नीट तुम्हांला
एका सद्गुरु पाशीं जावा ॥ धृ० ॥ सद्गुरु विणा नसे तुज गती ॥
वेद श्रुति वदताती ॥ ह्यांच्या वचना ठेवोनी ती ॥
नारायण–सुत भावा ॥ १ ॥

सकळासी आश्रयाला ॥ सकळासी पाळण्याला ॥
नारायण-सुत स्मरला ॥ एक सद्गुरु सहकारी ॥ २ ॥

८४ ( चालः—काना बनसरी बजाय गिरधारी )

ॐ लागत ध्यास बा म्हण हारी ॥ देहा दुःख होय तुला तें किती प्यारी ॥ धृ० ॥ कैसे जपशीं तरि त्या दुःखाना एकच तें नाम निर्धारी ॥ १ ॥ अनेक संकटें येती तुजवरि ॥ त्यांतुनीया तुजसी हें तारी ॥ २ ॥ एकच ॐ हें आवडे जिवा ॥ नच आवड या मना दुसरी ॥ ३ ॥ नारायण-सुत तल्लीन होउनी ॥ जपत ॐ हें नाम मुरारी ॥ ४ ॥

८५ ( चालः—अविचारे कोपांगारा )

ॐ म्हणतां काय जातें ॥ रे बा मातें ॥ समजेना कांहीं तू तें ॥ धृ० ॥
करीं घेतां दीप याला ॥ तमही गेला ॥ तैसे ज्ञानें अ-ज्ञानें
घालवीलें ॥ मुक्तितें भोगी साचें ॥ ॐ नाम घेई स्ववाचें ॥
मत्सरकार ॥ लोभ अपार ॥ काम विकार ॥
सोडोनी थार ॥ नारायण—सुता जातें ॥ १ ॥

८६ ( चालः—राम स्मरावा राम )

ॐ म्हणत तूं जाय बारे ॥ मनुजा ॐ म्हणत ॥ धृ० ॥
इहजन्मा नच घेइ जरि तूं पुढतीं करिसी जरि हाय ॥ मनुजा ॥ १ ॥

पुढील जन्मीं न होय बाधा ऐसेंच तें तूं नाम घेई रे ॥ मनुजा ॥ २ ॥
नारायण–सुता एकचि दिसलें ॥ आणिक नच तें सार ॥ मनुजा ॥ ३ ॥

८७. ( चालः–धर हारि चरण तर तरि )

ॐ तरि स्मरण तूं करी आठव श्री हरी करण्या सायना ॥ धृ० ॥
भजसी मनुजा बारे तनुजा ॥ सुखाला तूं वरि ॥
दुःखाला दूर करी ॥ लाविशीं व्यसना ॥ १ ॥
करि आळशी होउनी बसशी ॥ काळ येई तरि ॥
घेउनी तुज करीं कोण तें सोडिना ॥ २ ॥
नारायण–सुता समजुनी हें तरी ॥ एकच तो वरि ॥
सुखाला साहकारी ॥ रत बा भजना ॥ ३ ॥

८८ ( चालः–श्याम चुनरिया दे दे मोरी )

ॐ तुजला एक तारी ॥ धृ० ॥ एकनिष्ठ तूं ठेउनी भावा ॥
होय बा तें तूजसी हितकारी ॥ धृ० ॥ धांवत देखत रज्जु असे
जरि ॥ भासली ती सर्प हा असे परि ॥
नारायण–सुत भ्रम माघारी ॥ १ ॥

८९ ( चालः–या नव नवल नयनोत्सवा )

ॐ तुम्ही म्हणोनी मन तोषवा ॥ समजायातें नीट तुम्हांला
एका सद्गुरु पाशीं जावा ॥ धृ० ॥ सद्गुरु विणा नसे तुज गती ॥
वेद श्रुति वदताती ॥ ह्यांच्या वचना ठेवोनी ती ॥
नारायण–सुत भावा ॥ १ ॥

९० ( चाल:–प्रिये पहा रात्रीचा )

ॐ मना; ॐ कारा घेई थारा तोचि बा बरा ॥ धृ० ॥
विनती करी पामरा ॥ परिस तूं जरा ॥
नारायण–सुताला मार्ग ह्रा खरा ॥ १ ॥

९१ ( चाल:–पियावे देसगये )

ॐ सर्वांते व्यापुनी राहे रे जणू ॥ धृ० ॥ दृष्टि तव ती ठेउनी
पाहे रे सम दिसतेरे ॥ ॐ सर्वांते ऽऽऽ ॥ म्हण म्हण
सख्या भेद नको तुज ॥ सोडोनी आळस घे ॥ नारायण-सुता ॥ १ ॥

९२ ( चाल:–मज गमे ऐसा जनक )

ॐ जनांते तारायांते ॥ येई माते ॥ धृ० ॥ खास वाटे
हे ऐसे अकाशी ॥ सदा असे बा हें अविनाशीं ॥
भजताती ते घेई मुक्तिशीं ॥ निष्कलंक हें नाम करितें ॥ १ ॥
दुःखासी तुज हें देईना ॥ आतां तरि तूं घे बा ध्याना ॥
करी बारे षड्रिपुनिर्दलना ॥ नारायण–सुता येक गमतें ॥ २ ॥

९३ ( चाल:–आहारे मोरे सैंयां )

ॐ सर्वां असे भारी ॥ कळलें खास तारी ॥ सकलांते
हें उद्धारी ॥ धृ० ॥ म्हणसी तूं जरी बारे हरि हरी ॥
सुटला भवांधारी ॥ बनलासे सदाचारी ॐ सर्वांते ऽऽ ॥

नच कांहीं बा उरले त्व आतांवरी ॥ असे तो कैवारी ॥
नारायणा-सुता वारी ॥ १ ॥

९४ ( चालः--घेउनी ये पंखा )

ॐ पद झडकरी गांठाया ॥ जा; जा; जा; त्वरें ॥ धृ० ॥
जाउनिया बारे धरिसी गुरु चरणाला ॥ सार्थक तें होय बरें ॥
सु-कृत तव असलें म्हणुनी हें घडलें ॥ आतां नच फेरे ॥
नारायण-सुता आवडिलें हेंचि आतां नच तो कांहीं करे ॥ १ ॥

९५ ( चालः--मने सहांय करशे मुरारी रे )

ॐ म्हणी झणी तरि त्यालारे ॥ उघडले दैव तव घालारे ॥ धृ० ॥
चुकवोनी फेरे तूं त्या जाशीं शरणा ॥ सद्गुरु तुजसी बा तारे ॥१॥
समजुनी अशापरि जाशी कसा ॥ तरि गळां लागत वा फांसा ॥
करियेसी मग पश्चातापा ॥ नारायण-सुत वद तोरे ॥ २ ॥

९६ ( चालः--होरी; राग देश; ताल धमार )

ॐ खेळत; नाचत ॐ गाया ॥ काय म्हणू मी तया
गुणी राया ॥ धृ० ॥ हर तर हितकारी अंगमाचाऽऽऽऽगत ॥
तया न हरे नारायण-सुत ॥ १ ॥

९७ ( चालः--भासत हा द्राक्षाचा संघ )

ॐ लागल हा ध्यास तो ॥ दंग पवा सकलांचा ॥ दंग
पवा सकलांचा ॥ धृ० ॥ हडळ असे आशा चालिका ॥

मरण दे विफल ताण ॥ असुनि ती त्राता का; त्व देई ॥
नारायण–सुताधार ॥ १ ॥

९८ ( चालः–बहार दादरा; प्रियकरास तुझिया )

ॐ मना चार त्यजुनी तेथें राहिला ॥ ओळखी तूं
जाउनी त्या मातृपित्याला ॥ धृ० ॥ सु-कृत तवं असेल
बारे स्मरसी पदांला ॥ अन्य नसे उपयोगी हेचि
बा तुला ॥ नारायण–सुतासि गुरुनी हाचि दाविला ॥ १ ॥

९९ ( चालः–धृपद धमार )

ॐ नारायण जनार्दन ॥ ॐ रत हो तरि मन्मन ॥ धृ० ॥
ॐ श्रवण सदा ते असो नयन ॥ करते करो ॐ भजन ॥
जिवा ती ॐ नाम वदती जाण ॥
नारायण–सुताचा गेला ‘ पण ’ ॥ १ ॥

१०० ( चालः–गिरिधर ब्रिजधर मुरलि )

ॐ शंकर रमावर उमावर ॥ धरिं कर भव सिंधुपार
नेई ॥ धृ० ॥ तुजवरि टांकि भार ॥ तार मार ॥
वद झडकरी तव पदीं शरण फार ॥
नारायण–सुता तव तो आधार ॥ नच खंती
करितसे तो वार वार ॥ १ ॥

# तनात्मा-संवाद.

( चाल:-निज निज बाळा )

तन:-

ॐ प्राण सख्या; सोडोनी का; मज जाशी
एकली मी राहूं कैशीं ॥ धृ ॥
मम उदय असें जंव झाला ॥ उदयासी तूंही आला ॥
बाळपणीं बहु लीला ॥ केल्या असे त्या काळा
आजी निष्ठुर का; होवोनीया तूं जाशीं ॥ एथें मी
राहुं कैशीं ॥ ॐ प्राण सख्या ॥ १ ॥

आत्मा:-

पुण्याईचा संचय होतां ॥ म्हणोनीया मी होतोत्व
हातां ॥ ती संपली असें आतां ॥ मी जातों स्व-गृह
परतां ॥ नको आडवूं तूं मज आतां ॥ तुझा माझा
संबंध नसतां ॥ तूं बळेची म्हणसी भ्राता ॥ काय
मी वदूं तुज आतां ॥ अबला तूं होशी असे ग
खाशीं ॥ हा असे सदा अविनाशीं ॥ २ ॥

तन:-

आठवण नव्हती सख्या मजला ॥ तरुणपणीं मद
असें आला ॥ त्यामुळें झिडकारी तुजला ॥
व्यसनीं काळ बहू गेला ॥ नच पाहीं पुढती काळा ॥
त्यामुळें धोका असा घडला ॥ अन्यायचि बहू मी
केला ॥ नका टांकून हो जाऊं नारीशीं ॥
पदर मी पसरतें खाशीं ॥ ३ ॥

आत्मा:-

किती सोसूनी मी अन्याय ॥ नच विचार करतां पाय ॥
पुढती टांकिसी काय ॥ आतां करिसी हाय हाय ॥
कांहीं नच आतां उपाय ॥ येथेंच राहीं तूं होय ॥
मी मी जें जें बोले हिताशीं ॥ आठवण होई तुजसी ॥४॥

तन:-

वृद्धपणीं काळ आला ॥ नच विचारी
कोणी मजला ॥ झिडकारिती जनें मजला
कोणी म्हणती ' बा, ऊः हा आला ' ॥
वांकुल्या दावि बाळाला ॥ ऐसी स्थिती
होय समयाला ॥ का; निष्टूर तूं होउनि आजि जाशीं ॥
एकली मी राहूं कैशीं ॥ ५ ॥

आत्मा:—

किती हेका तूं धरिसी ॥ नच संगे राहे तुजशीं ॥
वचनचि आज मम खाशीं ॥ सोडी तूं या समयासी ॥
जाणे आहे एकविस कोशीं ॥ किती जरि मज
विनविशीं ॥ कां हट्टचि तूं घेउनी ऐसा बसशीं ॥
मग होय पुढती गत कैशीं ॥ ६ ॥

तन:—

गत पुढती कैसी होई ॥ नच विवेक मजला कांहीं ॥
सर्वां वसे तू ठायीं ॥ जागृती आतां मज होई ॥
विनविते आतां तव पायीं ॥ दासी ही पदरीं घेई ॥
सोडोनी तूं जाऊं नको रे मजशीं ॥
नच ठेवीं कोणी घटकेशीं ॥ ७ ॥

आत्मा:—

मज जाणे आहे बहू दूर ॥ जाणसी त्त्व मानसी सार ॥
तुज कोण काय करणार ॥ मायेनें किती रडणार ॥
मी पहात असें बसणार । कोणी म्हणती तुझा कार ॥
कोणी म्हणें तरी असतो कांहीं दिवशीं ॥
मम लग्न करी तरि खाशीं ॥ ८ ॥

तनः—

कोणी म्हणती उचला याला ॥ मग करा
गलगला बोला ॥ माझा बाळ बहु घाबरला ॥
जेवाया वेळ झाला ॥ स्वस्थलिं उभे का; ठेला ॥
आणा जा सामानांला ॥ फार वेळ तुम्हीं ठेवू
नका हो यासी ॥ त्वरा करा नेण्यासी ॥ ९ ॥

आत्माः—

स्त्री रडे असे स्वार्थाला ॥ बंधु म्हणे भाऊ हा नेला ॥
भगिनी म्हणें दादा आम्हांला ॥ सोडोनी का
असे त्वां गेला ॥ वरकरणी ही लोकांला ॥
लागली असें रडण्याला ॥ स्वार्थें ही रडे असे
सर्वांसी ॥ एक निःस्वार्थ रडे मातेशीं ॥ १० ॥

तनः—

रडुनी गोंधळ सारा केला ॥ मज संगे नाहीं कोणी
आला ॥ नेण्या मज स्मशानाला ॥ जमलें लोक
त्या काळा ॥ उचला म्हणती बा याळा ॥
नेले कीं; स्मशानाला ॥ रचिले असे पहा बघ चितेशीं ॥
मग दिधला अग्नि तो खाशीं ॥ ११ ॥

आत्माः—

बैसुनी कोक काय बोले ॥ जन्मा या जें जें आले
ऐसेच होउनी गेले ॥ संसारी श्रम बहु केलें ॥
परि संगे नच कांहीं आलें ॥ निःसार चि आम्हां
पटले ॥ अगाध असे ईश्वर लीला खाशीं
पटली गोष्ट आम्हांसी ॥ १२ ॥

तनः—

स्मशानींचें हे बोल ॥ ते घरीं आल्यावर फोल ॥
म्हणती झाले बहु हाल ॥ ऐसा सोडोनी हा महाल ॥
गेला असें तो लाल ॥ कंठु कसा तरि काळ ॥
मुखीं वद असे निघे पहा भार्येशीं ॥
ढोंग ते दावि लोकाशीं ॥ १३ ॥

आत्माः—

तीन दिंन होतां तुजला ॥ आवड असें तुज
ज्याला ॥ घेउनी येतीग तुजला ॥ आम्हां
अन्याय जो जो झाला ॥ ऐसे कोणी कोणी
बोलाला ॥ बोलती असे त्या काळा ॥
मुकला तो आज पहा लोकांशीं ॥
वैकुंठा गेला तो खाशीं ॥ १४ ॥

तनः—

चार पांच दिन होतां ॥ जंव जंव ऐसा काळ जातां ॥
बारावा दिन येतां ॥ मुक्तिचि करी
त्या आतां ॥ भोजन घाली लोकां परतां ॥
गेला तो स्वर्गी आतां ॥ धन्य पहा मानी
स्व—मनाशीं ॥ घटकेंत होय उदासी ॥ १ ॥

आत्मा:—

तेरा चौदावा आला ॥ आठवण कमी होत
जीवाला ॥ ऐसा काळचि तो चालिला ॥
बहुत दीन होतां त्याला ॥ आठवण नच
काढीं कोणी कोणाला ॥ जोवरि होतां तोवरि त्याला
नारायण-सुत म्हणे सर्वांसी ॥
जागृती करा जिवाशीं ॥ ७६ ॥

## आरती ।

ॐ जय जय सद्गुरुराज ॥
करतां धरतां तूं एक होशी महाराज ॥ धृ० ॥
ॐ जय जय ॥
तारक तूं मज होई ॥ संसार पयोब्धि हा ही ॥
स्व–करीं धरुनी मलाही ॥ फिटले मम जन्मी काज ॥१॥
केला ' पण ' तुलाही ॥ शत पदी
रुपे सुमनें ही ॥ गुंफोनी एकाग्र चित्ताहीं ॥
केळा हा हार ॥ घाली महाराज ॥ २ ॥
संकटें येवोनी तीं ॥ गेली मजवरती ॥
घालवि तूं ती ॥ आली मज प्रचिती ॥
तव सत्वें खेळें आज ॥ ३ ॥
त्यातुनी नच ढळलों ॥ सात्विक खेळा नच भ्यालों ॥
पद तव मी स्मरलों ॥ तेणें हटलें हें झाज ॥ ४ ॥
वायू तव तो आला ॥ अहंकार गेला ॥
षड्रिपु हा घाला ॥ उडवोनी दिधला ॥
मुक्तचि केलें मजला ॥ जिव शिवाला ॥
नारायण–सुत आज ॥ ५ ॥

ॐ ॐ ॐ ॐ

समाप्त ।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 2625

दा. क. 2825
REFBK-0002825
REFBK-0002825